कार्यालय
सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर
आवक क्र. 1877
01 AUG 2012
सहाय्यक आयुक्त का. अ.

(30)

गटई कामगाराना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना- निवीदा प्रक्रीया अंतिम करुन दर निश्चित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
**शासन निर्णय क्रमांक : गटई-२०११/प्र.क्र.१०१/अजाक-२**
मंत्रालय विस्तार भवन मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १४ मार्च, २०१२.

**वाचा :-** १) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक-गटई २००६/प्र.क्र.२०९/मावक-२,दि.१३/२/२००८.
२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक — गटई/२०१०/प्र.क्र.२१९/मावक-२,दि.२/१२/२०१०.
३) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक ; इबीसी २००८/प्र.क्र.२०७/मावक-२,दि.१४/२/२०११
४) संचालक समाजकल्याण पुणे यांचे पत्र क्र.संकल्प/गटई निविदा /१०-११/का.१४/९०८ दि.२१/७/२०११
५) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक — गटई -२०११/प्र.क्र.१०१/मावक-२ दि.२९/७/२०११
६) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक गटई -२०११/प्र.क्र.१४७/मावक-२ दि.८/१२/२०११
७) व्यवस्थापकीय संचालक,संत रोहिदास चर्मकार व चर्मोद्योग विकास महामंडळ मर्या. मुंबई यांचे पत्र क्र.सेवा/गटई/११-१२/४८९९ दि.१०/२/२०१२.

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र राज्यामध्ये चामडयाच्या वस्तु व पादत्राणे दुरुस्तीच्या क्षेत्रात मोठया प्रमाणावर अनुसूचित जातीच्या व्यक्ती असून त्यांच्या उपजिविकेचा प्रश्न यांच्याशी निगडीत आहे. या पादत्राणे दुरुस्त करणारे व्यावसायिक हे रस्त्याच्या कडेला उन्हापावसात बसून आली सेवा देत असतात. या व्यावसायिकांना ऊन,वारा,पाऊस यापासून संरक्षण मिळावे तसेच त्यांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी ग्रामपंचायत नगरपालिका क्षेत्रात १००% शासकीय अनुदानावर गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना शासन निर्णय दि.३१/१२/१९९७ अन्वये सुरु करण्यात आलेली होती. सदरहू योजना संदर्भाधीन अनुक्रमांक-१ येथील शासन निर्णयान्वये सुधारित स्वरुपात राबविण्यात येत असून, सदर योजनेच्या गटई स्टॉलच्या स्पेसिफिकेशन व डिझाईनमध्ये बदल करुन तसा शासन निर्णय संदर्भाधीन क्रमांक-५ अन्वये निर्गमीत करण्यात

ROTA/H 2871 (500-3-2012)।

C:\Documents and Settings\admin\Desktop\Govt..doc

आलेला आहे. संदर्भ क्रमांक-३ येथील शासन निर्णयान्वये सदर योजना संचालक, समाजकल्याण, पुणे यांच्यामार्फत राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता. तथापि सदरहू शासन निर्णय झाल्यानंतरही सदरहू योजनेला आवश्यक ती गती प्राप्त झाली नसल्याने सदरहू योजना संदर्भाधीन क्रमांक-६ येथील शासन निर्णयान्वये संचालक, समाजकल्याण पुणे यांच्या ऐवजी संत रोहिदास चर्मकार व चर्मोद्योग विकास महामंडळ मर्या. मुंबई यांच्या मार्फत राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. शासन निर्णय संचालक, समाजकल्याण, पुणे यांनी सदर योजनेसाठी त्यांचे स्तरावरुन निविदा तसेच ई निविदा प्रसिध्द करुन शासन निर्णय दि.८/१२/२०११ नुसार गटई स्टॉलचे दर अंतिम करण्याची कार्यवाही व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मकार व चर्मोद्योग विकास महामंडळ मर्या. मुंबई यांचेमार्फत करण्यात आली. सदर महामंडळाने न्युनतम निवीदा धारकांबरोबर वाटाघाटी करुन तसेच बाजारभावाची तुलना करून गटई स्टॉल किंमतीचा दि.१०/२/२०१२ रोजी शासनास सादर केलेला प्रस्ताव शासनाचे विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> : संत रोहिदास चर्मकार व चर्मोद्योग विकास महामंडळ मर्या.मुंबई यांनी शासन निर्णय दि.८/१२/२०११ नुसार कार्यवाही करुन दि.१०/२/२०१२ रोजी शासनास सादर केलेल्या प्रस्तावात सुधारित गटई स्टॉलच्या शासन निर्णयानुसार प्रति स्टॉलची किमत रु.४००००/- अधिक १२.५% विक्री कर (वॅट) म्हणजे एकूण रु.४५०००/- इतक्या रक्कमेस खालील अटीचे अधीन राहून शासन मान्यता देत आहे.

१) आयुक्त समाजकल्याण आयुक्तालय पुणे यांनी अवलंबिलेली गटई स्टॉलची ई निविदा प्रक्रीया व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मकार व चर्मोद्योग विकास महामंडळ मर्या. मुंबई यांनी अंतीम करण्यात यावी.

२)आयुक्त संचालक समाजकल्याण पुणे यांनी मागविलेल्या गटई स्टॉलची ई निविदा अंतिम करण्यासाठी निविदातील सर्व अटी व शर्ती तसेच महामंडळास योजना सुरळीतपणे राबविण्यासाठी अधिकच्या अटी व शर्तीसह निविदेमधील निम्नोत्तर पुरवठादाराबरोबर करार करण्याची संत रोहिदास चर्मकार व चर्मोद्योग विकास महामंडळ मर्या. मुंबई यांनी कार्यवाही करावी.

३)पुरवठादाराकडून अनामत रक्कम बँक गॅरंटी व इतर अटी व शर्तीबाबत व्यवस्थापकीय संचालक संत रोहिदास चर्मकार व चर्मोद्योग विकास महामंडळ मर्या. मुंबई यांनी कार्यवाही करावी.

४) सदर कामाच्या निविदामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार प्रारंभीक तयारी अग्रीम व कार्यादेश कार्यवाही संत रोहिदास चर्मकार व चर्मोद्योग विकास महामंडळ मर्या.मुंबई यांनी करावी.

५) कंत्राटदाराने सादर केलेली त्या महिन्याची देय्यके मंजूर करण्यापूर्वी, कंत्राटदाराने केलेल्या गटई स्टॉलची तपासणी आयटीआय मार्फत करुन, पुरवठादारास

H 2871-1 ३१

९० % देयके अदा करावीत . उर्वरित १० % पेमेंट गटई स्टॉलचा पुरवठा सबंधित जिल्हयाचे जिल्हा व्यवस्थापक यांचेकडून अहवाल आल्यानंतर अदा करण्यात यावे .

२. या योजनेसाठी आहरण व संवितरण अधिकारी आयुक्त, समाज समाजकल्याण, पुणे हे राहतील व नियंत्रक अधिकारी व्यवस्थापकीय संचालक संत रोहिदास चर्मकार व चर्मोद्योग विकास महामंडळ मर्या. मुंबई हे राहतील .

३. याबाबत होणारा खर्च "२२२५ - अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण, ०१ - अनुसूचित जातीचे कल्याण, १०२ - आर्थिक विकास, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना (०३)(०२) गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना (२२२५ २६२ २) ३१ सहाय्यक अनुदान,मागणी क्रमांक एन-३" या लेखाशिर्षाखाली खर्ची घालून, त्याखाली केलेल्या वित्तीय तरतुदीमधून भागविण्यात यावा.

४. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून सांकेतांक क्र. २०१२०३१४११५७५५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने.

(स. सं. बेनके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
मा.मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन यांचे उपसचिव
सर्व जिल्हाधिकारी
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोग, मुंबई
अध्यक्ष, सफाई कर्मचारी आयोग, महाराष्ट्र, मुंबई
प्रधान सचिव,(२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे

H 2871-2

व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोदयोग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई

संचालक, नगरपालिका प्रशासन, वरळी, मुंबई

महासंचालक, माहिती व जनसंपक महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीकरिता)

सर्व विभागीय उप आयुक्त, समाजकल्याण

सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण

सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, गट-अ जिल्हा परिषद

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

निवासी लेखा परिक्षक, मुंबई

सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

सर्व महानगरपालिका/ नगरपालिका/ जिल्हा परिषद/ कॅन्टोमेंट बोर्ड

संगणक कक्ष, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई (शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्दीकरीता)

निवड नस्ती, मावक-२.

..........

H 2871-275